खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ता. खेड, जि. पुणे

## द्वितीय वर्ष कला (SYBA)

## मराठी (जी - २)

## सत्र चोथे

## मराठी साहित्य : भाषिक कौशल्यविकास आणि आधुनिक मराठी साहित्यप्रकार : ललितगद्य (CC-1 D(3)A)

SANJAY MAR HRM

## घटक २) 'साहित्यरंग' पाठ्यपुस्तक

# लेख ७) तुझ्या नादानं पाहिली तुझीचं रे पंडरी... : जयंत पवार

डॉ. संजय शिंदे
उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ई - मेल : dr.sdshinde80@gmail.com भ्रमणध्वनी क्र. : 9604309060

## 'साहित्यारंग' पाठ्यपुस्तक

# लेख ७) तुझ्या नादानं पाहिली तुझीचं रे पंडरी... : जयंत पवार

### लेखक परिचय :

**मराठीतील एक महत्त्वाचे प्रयोगशील लेखक.** 'चंदेरी', 'नवशक्ती', 'लोकसत्ता', 'महाराष्ट्र टाइम्स' या **वृत्तपत्रातून पत्रकारिता.** 'वंश', 'अधांतर', 'काय डेंजर वारा सुटलाय' इत्यादी नाटके तसेच 'नाद', 'निनाद', 'पडसाद' या एकांकिका, 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' या कथासंग्रहाचे लेखन त्यांनी केले आहे.

### लेखाचा आशय :

**'तुझ्या नादान पाहिली तुझीच रे पंढरी', हा जयंत पवार यांचा आठवणीपर, आत्मपर लेख आहे. मुलाने वडिलांच्या आठवणीतून घेतलेला शोध आहे. हा आत्मशोध नातेसंबंध, गिरणी कामगार आणि वारकरी परंपरा व विठ्ठलभक्ती असा बहुस्तरीय आहे.**

**बापूला वडिलांच्या निधनानंतर त्यांची आठवण येते.** वडील जाऊन त्रेचाळीस वर्ष झाली. इतक्या वर्षात बाहेरचे जग बदललं; तरी बापूच्या मनातले जग मात्र तसंच आहे. बापूला वडिलांबरोबरचा संवाद सतत आठवतो. वडील गेले त्या दिवशीचा प्रसंग बापूच्या डोळ्यासमोरून तरळून जातो. त्या घटनेचा लोकांच्या लेखी बापूवर परिणाम झाला असावा; म्हणून हळहळतात. **पण बापू म्हणतो, की मी माझ्यामाझ्यात होतो. मला रडू येत नव्हते. उलट बारावीला मी नापास होणार आणि त्याचे कारण वडिलांच्या मृत्यूमुळे मला अभ्यास करता आला नाही, असे देता येणार होते.**

वडिलांच्या आजारपणामुळे बापूला त्यांच्या जाण्याचा अदमास आला होता. मधुमेहामुळे मागील तीन-चार वर्ष वडील आजारी असायचे. कामगार विमा योजनेच्या वरळीच्या हॉस्पिटलमध्ये नाहीतर बॉम्बे सेंट्रलच्या नायर हॉस्पिटलमध्ये ते ॲडमिट व्हायचे. **घरी आल्यावर दोन तीन महिने ते कामावरही जात नसत. मग आजारी माणसाचा ताण हलका व्हावा म्हणून बापू वडिलांना नाटकाला घेऊन जायचा.** वडिलांनीही कधीकाळी



SANJAY MAR HRM

नाटकात भूमिका केल्या होत्या. कधीतरी त्यांनी बापूला **'सत्तेचे गुलाम' आणि 'हाच मुलाचा बाप' ह्या वरेरकरांच्या** नाटकाचे संवाद म्हणून दाखवले होते. **वडिलांना रिलिफ वाटावा म्हणून बापू जाणीवपूर्वक त्यांना विनोदी फार्सिकल नाटकांना घेऊन जायचा.**

बापू सांगतो, की शेवटच्या वर्षात वडील खूप थकले होते. आता मला अठरा वर्षे पूर्ण झाली, की वडिलांच्या जागेवर मिलमध्ये कारकून म्हणून नोकरी मिळणार होती. तसा शब्द **मॅनेजर गोरे** यांनी वडिलांना दिला होता. अर्थात वडिलांना त्यांच्या पश्चात घराची काळजी होती. **बापूने घर सांभाळावे, सावत्र आई व भावंडांशी समजुतीने वागावे; अशी वडिलांची अपेक्षा होती.**

**सावत्र आई असलेल्या माईंचे व बापूचे संबंध कधीच चांगले नव्हते.** बापू सहा महिन्यांचा असताना त्यांच्या आईचे कॅन्सरने निधन झाले. मग वडील दारू प्यायला लागले होते. त्यातून बाहेर पडण्यासाठी घरच्यांनी त्यांचे दुसरे लग्न लावून दिले होते. वडिलांची दुसरी पत्नी असलेल्या माईंचे घरात दुसरेपणामुळे स्वागत झाले नाही. माईंचे वागणेही उद्वेगजनक होते. बापू मात्र कथा लेखनाच्या निमित्ताने सावत्र आईविषयी डायरीत चांगले मत मांडतो. अर्थात ती सावत्र आईविषयीची कथा होती. त्यात बापूने सावत्र आई विषयी चांगल्या अपेक्षा व्यक्त केल्या होत्या. ती डायरी वडिलांनी गुपचुप वाचल्याने त्यांना बापूबद्दल समाधान वाटू लागते. त्यानंतर दहा दिवसात वडील गेल्याने बापूही मागील कडवट भावना विसरून सावत्र आईविषयी प्रेमाने वागायचे ठरवतो. ते माईंसह सर्वांनाच अनपेक्षित असते. पुढे माईंचाही बापूवर विश्वास बसू लागतो. अगोदर माईंना आणि तिच्या चार मुलांना घरात इतकीशी प्रेमाची वागणूक मिळालेली नसते. पण या चारही भावंडांचा बापूवर विश्वास होता. **त्यामुळे वडिलांच्या पश्चात या सर्वांची जबाबदारी आपण नीट निभवावी, असा निश्चय बापू करतो.**

**बापूच्या वडिलांनी जगण्याचा मनमुराद आनंद घेतलेला असतो. ते रसिक, कलावंत होते. त्यांचा मित्रांचा गोतावळा मोठा होता. घरात शोभेच्या वस्तू होत्या. प्रथमोपचाराचा बॉक्सही होता. एकाहत्तरच्या युद्धाच्यावेळी ते सिव्हील सर्विससाठी गेले होते. त्यांचे अं:तकरण लोकांसाठी सदैव खुले होते.** त्यांनी अनेकदा धार्मिक तीर्थाटनही केले होते. एकदा शंकरराव मोरे यांच्यासोबत ते पंढरपूरला वारीला गेले. **चंद्रभागेच्या वाळवंटातील वैष्णवांचा मेळा पाहून त्यांनाही साक्षात्कार झाला आणि विठ्ठलभक्तीत ते लीन झाले. घरात**

SANJAY MAR FIRM

**संतसाहित्य जमा होऊ लागले. पारायणे सुरू झाली. गिरणीत कारकुनी करणाऱ्या प्रापंचिक माणसाचे पारमार्थिक माणसात रूपांतर झाले.** वडील हरि कीर्तनात रंगू लागले. ते विठ्ठलमय झाले. अखंड नामस्मरणात दंग होऊ लागले. वडिलांच्या जाण्याने बापूलाही अध्यात्माची आवड लागली. पण संसार करणेही तितकेच क्रमप्राप्त होते. बापू धार्मिक कर्मकांडात अडकला नाही. त्यांनी नोंदणी पद्धतीने विवाह केला. पत्नी संध्याचे विचार परंपरेला छेद देणारे होते. तर नात सई नास्तिक विचारांची होती. बापू म्हणतो, विधी आणि क्रियाकर्मात अडकलेल्या धर्म माझ्या जाणिवेतून निघून गेला होता; पण ईश्वर गेला नाही.

**बापूच्या वडिलांनी स्वतःचा संसार करताना त्यांचे भाऊ, बहिणी आणि गावाकडेही तितकेच लक्ष दिले. धाकट्या भावांना वेळोवेळी मदत केली.** त्यांच्या मुला-मुलींना स्थळे पाहिली त्यांची लग्ने लावून दिली. लग्न ठरलेल्या मुलींमध्ये रोमँटिक भाव जागा व्हावा यासाठी **'रुक्मिणीस्वयंवर'** काव्य आवर्जून वाचायला दिले. गावाहून येणाऱ्या मुलांना वेळोवेळी मदत केली आणि समाजाला जितके देता येईल तितके देण्याचा प्रयत्न केला.

बापू जेव्हा वडिलांचा विचार करतो, तेव्हा ते त्याच्या आयुष्यातून फार लवकर निघून गेल्याची खंत त्याला वाटते. बापूला वडिलांचा म्हणावा असा सहवास लाभला नाही. त्यांच्या कुशीत झोपणे राहून गेलं. याचे त्याला दुःख होते.

**बापूने वडिलांचा भ्रमनिरास केल्याच्या दोन आठवणी सांगितल्या आहेत.** साने गुरूजी कथामालेतर्फे गोष्टींच्या स्पर्धेत वडिलांनी गोष्ट शिकवूनही बापूने ती ऐनवेळी स्पर्धेत सांगितली नाही. तसेच लालबागच्या वराडकर गुरुजींकडे गणित आणि इंग्रजी शिकवणी लावली असतानाही बापूने जाणीपूर्वक ती परस्पर बंद केली. या दोन्ही प्रसंगात बापूने वडिलांचा विश्वासघात केला होता. याचेही बापूला तीव्र दुःख होते.

**वडिलांच्या पश्चात बापूने घराची जबाबदारी नीट पार पाडली की नाही याबाबतीत तो साशंक आहे.** दोन सावत्र भाऊ सुमंत आणि अनंत ऐन तारुण्यात व्यसनांच्या आहारी गेले. त्यांना जगण्याचा मार्ग सापडला नाही. बापूही त्यांना तो दाखवू शकला नाही. अनंतजवळ तर गाण्यांचा कान होता. पण त्यालाही स्वतःला सावरता आले नाही. अन चाळिशीत त्यांनी जगाचा निरोप घेतला.

**बापूने वडिलांची तुळशीची माळ, सागवानी कपाट, चामड्याचे पाकीट, ग्रंथ, अध्यात्मावरील पुस्तके, आई वडिलांचा फोटो जपून ठेवला आहे. नव्हे घट्ट पकडून ठेवला आहे. वडिलांच्या आठवणींच्या खुणा बापू स्वतःच्या स्मृतीत तितक्यात तीव्रतेने तेवत ठेवतो.**

## या लेखाचे विशेष :

अशाप्रकारे 'तुझ्या नादान पाहिली, तुझीच रे पंढरी' या जयंत पवार यांच्या आत्मपर लेखात वडिलांच्या आठवणींना उजाळा मिळालेला आहे. मुलगा एक दीड वर्षाचा असताना आईचा मृत्यू होतो. मुलाला मात्र मातृसुख मिळत नाही. वडिलांच्या जीवनात आईच्या निधनाने अनेक स्थित्यंतरे येऊन अखेरीस ते विठ्ठलभक्तीत रममाण होतात. पण शेवटच्या आजारात ते धास्तावतात. स्वतःच्या कुटुंबाची पुढील व्यवस्था करीत असताना ते मरण पावतात. त्यानंतर त्रेचाळीस वर्षांनी मुलगाही वार्धक्याकडे वयाच्या साठीकडे पोहोचतो. वयाच्या या टप्प्यावर मुलगा स्वतःच्या पित्याशी असणाऱ्या नात्याचा शोध घेतो.

**त्याचा हा आत्मशोध बहुस्तरीय आहे. पिता-पुत्र, सावत्र आई, सावत्र भावंडे, आजोबा, मामा अशा नातेसंबंधाचा एक स्तर आहे. दुसऱ्या स्तरामध्ये गिरणी कामगारांचे विश्व आहे. तर तिसरा स्तर हा वारकरी परंपरा आणि विठ्ठलभक्तीचा आहे. असा हा बहुपेडी, बहुस्तरीय आत्मशोध आहे. या आत्मशोधात मुलाची स्वतःची 'झाडाझडती' आहे. त्याचा कबुलीजबाब आहे. भूतकाळाचा अन्वयार्थ आहे. मात्र यामध्ये दोषारोप नाही. अटीतटीने केलेले विरोध-समर्थन नाही. हार-जीत नाही. अतिरिक्त भावव्याकुळता नाही किंवा कोरडेपणाही नाही. तर या संयत आत्मविष्करामध्ये अलिप्तता आणि आर्ततेचा एक अभूतपूर्व संगम आहे. मात्र मातृसुखाला आसुसलेला, आईच्या कुशीत झोपण्यापासून पारख्या झालेल्या मुलाचे वडिलांच्या कुशीत झोपण्याचे स्वप्न आहे. म्हणून अखेरीस मुलगा म्हणतो, तुझ्या (वडिलांच्या) नादानं तुझी ही पंढरी पाहिली. आता वडिलांनी पंढरीच्या विठ्ठलाला बाजूला सारून आपल्याला एकदा छातीवर झोपवावे. मुलाच्या या आर्त इच्छेमध्ये हा लेख पूर्ण होतो. एक तरल भावावस्थेतील आत्मचिंतन एक प्रगल्भ, संपन्न जीवनानुभव देते.**

---



SANJAY MARHRM

अध्यापन साहित्य निर्मिती :
डॉ. संजय शिंदे ,
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

**संदर्भ ग्रंथ :**

१) साहित्यरंग : डॉ. शिरीष लांडगे व इतर (संपादक)

SANJAY MAR HRM